# स्वातंत्र्य चळवळ व मराठी कादंबरी

डॉ. भरत जाधव

कला व वाणिज्य महाविद्यालय,

सातारा.

९४२११८३८३७

bharatjadhav13@rediffail.com

प्रस्तावना

महाराष्ट्र हा जसा सुधारणावादी विचारांसाठी, संपन्न, शिक्षणसंस्थेसाठी व समृद्ध साहित्यपरंपरेसाठी प्रसिद्ध आहे. तसाच राष्ट्रव्यापी स्वातंत्र्यचळवळसाठीही प्रसिद्ध आहे. भारतात ब्रिटीशांची राजवट स्थिरावली १८१८ ला, ती पुण्यातल्या शनिवारवाडयाचे मराठी निशाण उतरल्यावर अखंड हिंदुस्थानवर्षात शेवटी इंग्रजांच्या अंमलाखाली आलेला हा प्रदेश; आणि हा हिंदुस्थानवर्ष स्वतंत्र्य होण्याच्या पूर्वी कितीतरी अगोदर प्रतिसरकार स्थापून स्वत:चं सरकार निर्माण करणारा वंदनीय प्रदेश. क्रांतिसिंह नाना पाटलांच्या पावन स्पर्शाने पुनित झालेला हा प्रदेश, हा परिसर भारतीय स्वातंत्र्यासाठी आपल्या उभ्या आयुष्याचं, सारसर्वस्वांच बलिदान दिलं. मराठी निशाण उतरल्यावर ब्रिटीशांना पुढे त्राही भगवान करून सोडण्यात ज्यांचा सहभाग होता त्यात महाराष्ट्राचा सिंहाचा वाटा होता. आणि महाराष्ट्रामध्ये सातारा व सांगली म्हणजे जुना उत्तर सातारा व दक्षिण सातारा या जिल्हांनी अनेक नवरत्ने या भारतभूसाठी दिली. क्रांतीसिंह नाना पाटील, क्रांतिअग्रणी जी. डी. बापू लाड, क्रांतीवीर पद्मभूषण डॉ. नागनाथ आण्णा नायकवडी, क्रांतीवीर भगवानराव बप्पा पाटील, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री व थोर स्वातंत्र्यसैनिक पद्मभूषण वसंतदादा पाटील, जेष्ठ स्वातंत्र्यसेनानी राजाराम बापू पाटील, क्रांतीवीर बर्डे गुरूजी, हुतात्मा नानकसिंह, पांडूमास्तर, मोहिते वडगावचे बाळकू आण्णा, कॅप्टन महादेव मोहिते, कुंडलमधील व परिसरातील अनेक थोर स्वातंत्र्यसैनिक यांच्या अथक परिश्रमातून व क्रांतीकार्यातून स्वातंत्र्याची मशाल पेटवली. या स्वातंत्र्याच्या धगधगत्या अग्नीकुंडात आपले जीवनसर्वस्व अर्पण केले. इंग्रजांच्या लाठया अंगावार झेलल्या. तुरूंगवास सोसला या सा—या क्रांतीकारकांच्यावर मराठी साहित्यात चित्रण अगदी तोटकेपणे आढळते हे सुरूवातीलाच नमुद करावे लागते.

### अभ्यासविषय निवडीमागील उद्देश

१. मराठी कादंबरी आाणि स्वातंत्र्य चळवळ यांचा अनुबंध तपासणे.

२. मराठी कादंबरीतून आलेल्या स्वातंत्र्यप्रेरणांचा अभ्यास करणे.

३. मराठी स्वातंत्र्य काळातील चित्रित कादंबरीच्या प्रभावांचा अभ्यास करणे.

४. स्वातंत्र्य चळवळ व मराठी कादंबरी राजकारण , अर्थकारण व संस्कृती यांचा सहसंबंध तपासणे.

५. भौगोलिक व सामाजिकदृष्टया साहित्यातील पैलूंचे विवेचन करणे.

**संशोधन पध्दती**

स्वातंत्र्य चळवळ व मराठी कादंबरी या संशोधन विषयासाठी अन्वयार्थक संशोधन पध्दती,संदर्भान्चयी संशोधन पध्दती, तौलनिक साहित्याभ्यास पध्दती, मानसशास्त्रीय संशोधन पध्दती , सैध्दांतिक संशोधन पध्दती अशा विविध संशोधन पध्दतींचा वापर केला जाणार आहे.

**मराठी कादंबरी आणि स्वातंत्र्य चळवळ**

स्वातंत्र्यापूर्वी व स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्रामध्ये विविधरंगी राजकीय जीवन नांदत आले आहे. त्या राजकीय जीवनाला अनेक पैलू आहे. शंभर—दीडशे वर्षात परकीयांप्रमाणेच स्वकीयांबरोबरही क्रांतीवादी अशा विचारधारा महाराष्ट्रात होत्या. तशाच बदलत्या स्वरूपात स्वातंत्र्योत्तर काळातही त्या कायम राहिल्या. संघर्षाची निमित्ते, संघर्षाचे स्वरूप, पद्धती बदलली पण विचारांचा संघर्ष हे महाराष्ट्राच्या जीवनपद्धतीचे अविभाज्य अंग आहे. विचारप्रवण व कार्यप्रवण करणारी माणसे आजही बदलली नाहीत हे त्याचेच फलीत आहे. चीन पाकिस्तानशी झालेली युद्धे, संयुक्त महाराष्ट्राच्या १०८ हुतात्म्यांच्या बलिदानाचा लढा, गोवा मुक्तीसंग्राम, आणिबाणी व अनेक आंदोलत महाराष्ट्राचे क्षात्रतेचे तळपले आहे. उक्तीला कृतीची जोड देऊन कामगार लढे, शेतकरी लढे, सहकार चळवळी, दलित संघर्ष, नामांतर चळवळ अशा कितीतरी चळवळी महाराष्ट्राने अनुभवल्या.

भारतीय स्वातंत्र्यचळवळीमध्ये सक्रिय सहभाग घेतलेले अनेक क्रांतीकारक थोर साहित्यिकही होते. महात्मा फुले, लोकमान्य टिळक, यशवंतराव चव्हाण, महात्मा गांधी, पंडीत नेहरू, स्वातंत्र्यवीर सावरकर, सानेगुरूजी, आचार्य अत्रे, प्रा. ग. प्र. प्रधान, मुकुंदराव किर्लोस्कर यांनी स्वातंत्र्यचळवळीमध्ये सहभाग घेतला तसेच ते साहित्यिक म्हणूनही गणले गेले. वैचारिक आणि ललित वाङमयामध्ये यांच्या निर्मितीने अविट असा ठसा उमटविला आहे. पण इतर साहित्यिकांनी लिहिलेल्या कथा, कादंबरी, नाटक, काव्य, वैचारिक साहित्य, यामधून स्वातंत्र्याची चळवळ किती प्रमाणात व कशी उमटली ? हे पहाणे या शोधनिबंधाचा मुख्य हेतू आहे. ‘ Art is like a mirror ’ असे प्लेटो ऑरिस्टॉटलपासून म्हटले गेले आहे. त्याचा विचार करता स्वातंत्र्यपूर्व काळातील परिस्थितीचा विचार करता स्वातंत्र्यचळवळीचे म्हणावे

तितके चित्रण मराठी साहित्यातून आले नाही हे खेदाने नमुद करावे लागते. जिथे हजारावर कथा लिहिल्या, हजारावर कादंब—या लिहिल्या त्यामध्ये निर्देशित करता येतील अशा पाचपंचवीस पुस्तकांची यादी झटकता देता येत नाही. अपवाद फक्त नाट्यवाङमयाचा आहे. कलाकृती स्वान्तसुखाय आहे हे म्हणणे जरी बरोबर असले तरी जीवनावकडे पाठ फिरवून सिगारेटच्या धुराच्या वलयात, प्रेमी—प्रेमिकांची बीभत्स चित्रणे करून कामुक प्रवृत्ती वाढवणा—या साहित्याचा काय उपयोग ? फडक्यांनी कलेसाठी कला तत्व मानून ठोकेबाज रंगेल चित्रण करण्यात आपली उभी हयात घालवावी त्यांच्याकडून १००—१५० पुस्तकातून एखाद—दुसरे पुस्तक असावे ही चिंतेचीच नव्हे तर चिंतनाची बाब ठरावी.

अनेक पुस्तकातून भारतीय स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास लिहिला गेला आहे पण तटस्थवृत्तीने घेतलेला गतकाळातील घटनांचा मागोवा म्हणून आपण इतिकासाकडे पाहतो. आपण इतिहासाला ललित साहित्य म्हणून संबोधत नाही. मग ललित्याच्या अंगाने रसिक वाचकांना कार्यप्रवण व कृतीप्रवण व विचरप्रवण करणारे इतिहासाचा दाखला देणारे साहित्य मराठी साहित्याने किती पेलले? हे शोधण्याचा प्रस्तुत शोधनिबंधकाचा हेतु आहे.

यवनांपासून आपण स्वतंत्र असावं म्हणून फार पूर्वीपासून स्वातंत्र्यलढा चालत आला आहे. भारतावर, महाराष्ट्रावर गझनीचा महमद, घौरी यांच्याही अगोदरपासून स्वाऱ्या होत आलेल्या आहे. शक, हुण यांच्याकाळापासून आपणास त्याचा आढावा घेता येतो. पण शिवाजी महाराजांपासून आपली अस्मिता ख—या अर्थाने जागृती झाली. तो इतिहास बखरवाङमयातून लिहून ठेवला आहे. शिवचरित्रात्मक अनेक बखरी मराठी वाङमयामध्ये दिसतात. त्याप्रमाणेच पेशव्यांच्या प्राक्रमाच्या बखरीही दिसतात. इतिकासकालीन अनेक घराणी व त्यांच्या पराक्रमासह मराठी साहित्यातून चित्रित झाली आहेत. गुलामांना त्यांच्या गुलामगिरीची मग ती मानसिक, शारीरिक, आर्थिक कोणतीही गुलामगिरी असो त्याची जाणीव त्याला करून दिली म्हणजे ते लढवण्यास प्रवृत्त होतात. स्वतंत्र होण्याचा प्रयत्न करतात दलितांचा लढा हे त्याचे उत्तम उदाहरण आहे. जिथे गुलामगिरी लादली त्या गुलामगिरीच्या कचाटयातून सुटण्यासाठी केलेला लढा व त्यातून मिळवलेली मुक्ती ही सर्वच स्वातंत्र्यचळवळीची विविध अंगे आहेत. पण प्रस्तुत शोधनिबंधामध्ये फक्त ब्रिटिशांच्या गुलामगिरीतून मुक्त होऊन आपण स्वतंत्र झालो त्या स्वातंत्र्यलढयाचा इतिहास मराठी साहित्यामध्ये किती लिहिला गेला हा शोधनिबंधाचा विषय आहे. स्वातंत्र्योत्तर फक्त 'गोरे गेले आणि काळे आले' हीच परिस्थिती असली तरी इंग्रजांना हाकलून लावण्यासाठी ज्या ज्या स्वातंत्र्य चळवळी घडल्या. त्यापैकी किती स्वातंत्र्य चळवळी ललित कृतीतून आल्या हे पहाणे गरजेचे ठरते.

मराठी साहित्याची पहाट मुक्तेश्वरांपासून उगवली असली तरी गुलामगिरीची जाणीव करून देणारी प्रेरणा महात्मा फुल्यांच्या 'शेतकऱ्याचा आसूड' पासून मिळाली. 'गुलामगिरी', तृतीय रत्न', 'ब्राम्हणाचे कसब' यापासून ही जाणीव सुरू झाली. कृष्णराव भालेकर, धनुर्धारी उर्फ रा. वि. टिकेकर यांनी मराठी साहित्याला पुढे नेण्याचे कार्य केले. इतिहास ज्यांना माहित आहे अशीच माणसं भविष्यकाळ घडवू शकतात. व वर्तमानात जगतात. ज्यांना इतिहास माहित नाही अशी माणसं भविष्यकाळ घडवू शकत नाहीत ती वर्तमानाच्या फांदीवर जगतात आणि शेखचिल्लिसारखी तीच फांदी तोडतात. अन जी इतिहासातच रमतात ती भविष्याकडे व वर्तमानाकडे बघत नाहीत. या तिनही गोष्टींचा विचार करता इतिहासाचं सजग भान ठेऊन भविष्याकडे तारतम्याने पाहण्याची दृष्टी मराठी साहित्यिकांनी बाळगली व मराठी कादंबरी, कथा, काव्य, नाटक, आत्मचरित्र व वैचारिक वाङमय जन्माला आले.

**मराठी कथा—कादंबरी आणि स्वातंत्र्यचळवळ.**

भारतीय स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास ललित्याच्या अंगाने शब्दबद्ध करणा—या अनेक मराठी कादंब—या लिहिल्या पण एकुण कादंबरीवाङमयाचा विचार करता त्याचे प्रमाण अगदीच नगण्य आहेत. स्वातंत्र्यपूर्व काळातील राजकीय विचारांचे साहित्य हे मुख्यत्वे इंग्रजावर टीका करणारे, अन्यायाविरूद्ध प्रतिकाराची भावना निर्माण करणारे व स्वातंत्र्याच्या आकांक्षेने प्रीत मनांची अभिव्यक्ती करणारे आहे. सामुहिक विचारांची अभिव्यक्ती, राष्ट्रवादी विचारांची अभिव्यक्ती, इंग्रज, पोर्तुगिज, डच विरूद्ध भारतीय संस्कृती अशी संस्कृतीभेदांमधील अभिव्यक्ती याचे दर्शन घडताना दिसते. स्वार्थत्त्याग, आत्मसमर्पण व राष्ट्रनिष्ठा यांचे विलोभनीय चित्रण एकुणच वैचारिक वाङमयातून उमटले आहे. व्यक्तींच्या स्वार्थाचा विचार गौण ठरवून देशाचा विचार महत्वाचा ठरला. मार्क्सवाद, साम्यवाद, साम्यवाद हवा की फ्रॉईड हवा या द्वंद्वांचे प्रतिबिंब मराठी साहित्यावर पडले.

टिळक युगाच्या अस्तानंतर म्हणजे १९२० नंतर भारतात राजकीय स्थित्यंतर घडले. महात्मा गांधींचा भारतीय राजकारणातील उदय ही एक महत्वाची व जमेची बाजू झाली. गांधीवादी तत्वज्ञानाने अखिल भारतीयांनाच नव्हे तर संपूर्ण विश्वाला भूरळ घातली भारतीय स्वातंत्र्यलढयातील स्वातंत्र्यवीरांचा विचार करता गांधीवादी विचारसरणीने भारलेले अनेक स्वातंत्र्यवीर भारताच्या स्वातंत्र्यलढयामध्ये प्राणाची आहुती देण्यासाठी पुढे सरसावले. 'पेटलेले पारतंत्र्य व धुमसते स्वातंत्र्य' या पुस्तकामध्ये भारतीय स्वातंत्र्यलढयाचा तेजस्वी इतिहास आपणास वाचावयास मिळतो. डॉ. द. न. गोखले यांनी स्वातंत्र्यवीर सावरकरांच्यावर अतिशय सुंदर लेखन केले आहे. श्री. रा. बिबलकर यांनी लिहिलेली 'सुनिता' या कादंबरीमध्ये फाळणीच्या वेळचे पूर्वबंगालमधील परिस्थितीचे वास्तव चित्रण केले आहे.

सानेगुरूजींनी ‘क्रांती’, ‘नवा प्रयोग’ या कादंबऱ्यांमधून कामगार चळवळ, सखाराम, घना, मालती इत्यादीनी इंदूर संस्थानातील माळरानावर उभे केलेले नवे जग, त्यातून प्रचलित व्यवस्थेला दिलेला नकार अत्यंत महत्वाचा आहे. पण भाबडेपणा म्हणून बाजूला सारण्याची वृत्ती यामुळे ‘श्यामच्या आई’ ला जितके महत्व मिळाले तितके दुस—या कादंब—यांना मिळाले नाही. भारतीय स्वातंत्र्यलढयामध्ये भारतीय स्वातंत्र्यवीरांचे श्वास झालेले ‘वंदे मातरम्’हे गीत म्हणजे भारतीयसंस्कृतीचा एक अनमोल ठेवा होय. हे गीत लिहिणारे ‘आनंदमठ’ कार बंकिमचंद्र चतर्जी यांच्या जीवनावरील एक पुस्तक सुबोधचंद्र सेनगुप्त यांनी लिहिले आहे. त्याचे मराठी भाषांतर श्री. बा. जोशी यांनी केले आहे. यातून भारतीय स्वातंत्र्याच्या इतिहासाबरोबर बंकिमचंद्राचे जीवनकार्यही पहावयास मिळते.

स्वातंत्र्यवीर सावरकारांनी लिहिलेल्या ‘माझी जन्मठेप’ या आत्मचरित्रातून तसेच ‘काळे पाणी’, ‘१८५७ चे स्वातंत्र्यसमर’, ‘हिंदुपदपादशाही’, ‘सहा सोनेरी पाने’, ‘माझ्या आठवणी’ या पुस्तकातून भारतीय स्वातंत्र्यलढयाचा धगधगता ओजस्वी व तेजस्वी इतिहास आपणास पहावयास मिळतो. श्री. व्यं केतकर यांनी ‘नि:शस्त्राचे राजकारण’ (१९२६) या कांदबरीत भारतीय स्वातंत्र्यासंबंधीचे विचार व्यक्त केले आहेत. विनायक भोळे यांची ‘फाटकी वाकळ’ वरंरकरांची ‘मी रामजोशी’, यातून ग्रामोद्धार व गांधीवादावर सक्रीय निष्ठा असलेल्या व्यक्ती आपणास दिसतात. वि. वा. हडपांच्या ‘गोदाराणी’ या कादंबरीत साम्यवाद व लाल झेंडा यांचे चित्रण आले आहे. वा. म. च्या ‘सुशीलेचा देव’ मधील प्रमुख पात्रांच्या जीवनदृष्टीत विशिष्ठ राजकीय तत्वज्ञानाचे पडसाद उमटलेले असून गांधीवादाच्या विधायक कार्यक्रमाला प्रत्यक्षात साकार करण्याकरीता मन:पूर्वक स्वार्थत्याग करणा—या विनायकरावांची वीर कहाणी ‘इंदू काळे सरला भोळे’ या कादंबरीत सांगितली आहे. वि वा. हडपांची ‘अन्नदाता उपाशी’, ‘गोदाराणी’, ‘वादळ’ या कादंबऱ्या म्हणजे कादंबरीमय आंग्लशाही आहे असे म्हटले जाते. १८१८ ते १९४८ या कालखंडातील भारताच्या इतिहासाच्या स्वातंत्र्यप्राप्तीच्या इतिहासाची कहाणी हा राजकीय कादंबरीलेखनाचा उल्लेखनीय असा विराट स्वरूपाचा पण कलात्मकतेच्या सामान्य पातळीवरचा प्रयत्न आहे. असे अ. ना. देशपांडे म्हणतात.

(अ. ना. देशपांडे मराठी वाङमयाचा इतिहास. खंड २ व्हीनस प्रकाशन पुणे २ री आवृत्ती १९७० पा. नं. ११५)

जोशी—माडखोलकर—खांडेकर यांच्या कादंबऱ्यातील राजकीयतेचे समालोचन करीत असताना तत्संबंधीची एक उणीव मनात तीर्वतेने जाणवू लागते ती ही की, १९२० नंतर निरनिराळया वाङमयप्रकारातून लेखन करणाऱ्या कितीतरी साहित्यिकांच्या आघाडीवर असलेल्या या नामवंत

कादंबरीकारांच्या हातून स्फुर्तीदायक व रसरशीत स्वरूपाची एकही बहारदार अशी राजकीय कादंबरी निर्माण झाली नाही. महाराष्ट्राचे अत्यंत जिव्हाळयाचे मनोगत वस्तुत: ज्यांच्या समर्थ लेखणीतून अत्यंत उत्कटतेने व्यक्त व्हावे अशा या लोकप्रिय कादंबरीकारांची प्रतिभा लोकांच्या जीवनमरणा—या प्रश्नांच्या चिंतनाने आणि निदिध्यासाने प्रस्कुरली नाही, प्रक्षुब्ध झाली नाही. अनिवार पेट घेऊन जनतेचा स्वातंत्र्यप्राप्तीच्या विराट प्रश्नाचे चैतन्यदायी चित्रण करण्यास लागणारे दिव्यत्व आणि उदात्तत्व त्यांच्या प्रतिभेत नसल्यामुहे? की स्वातंत्र्यप्राप्तीच्या संग्रामातील नेतृत्वावर कादंबरीकाराची निस्सिम निष्ठा नसल्यामुळे? की त्यांच्या अंगी निडर निर्भयता नसल्यामुळे?—(अ. ना. देशपांडे मराठी वाङमयाचा इतिहास. व्हीनस प्रकाशन पुणे— २ री आवृत्ती १९७० पा नं ११५) तर ग. प्र. प्रधान म्हणतात ''स्वातंत्र्यलढयात स्वत:ला झोकून देणा—या कार्यकर्त्यांच्या ध्येयासक्त जीवनाचे वास्तव चित्रण मराठी ललित साहित्यात फारसे झालेले नाही.''

(ग. प्र. प्रधान मराठी साहित्यातील राजकारणाचे प्रतिबिंब— प्रतिमा प्रकाशन पुणे— १९९८ पान नं. १७)

व्यंकटेश माडगुळकरांची 'कोवळे दिवस', स्वातंत्र्यचळवळ व वावटळ. गांधीहत्येनंतर उसळलेली दंगल, प. स. देसाई यांची १८५७ च्या बंडाचा वणवा, अ. ब. कोल्हाटकरांची— इग्रजांचा पराभव, धो. मु. देशपांडे यांची बंडाचे निशाण, स्वातंत्र्याच्या रणांगणात, असहकार आंदोलनावर आधारीत असहकार आंदोलनाचे तरूण विद्यार्थ्यांवर पडलेला प्रभाव व त्याचे परिणाम शिवराम यांच्या 'विषप्रयोग' (१९२८), सी. शि. लाटलीकरांची 'दडपशाही' (१९२६) यामध्ये उमटलेले आहेत. एकनाथ यादव निफाडकरांनी 'महात्मा गांधी सैतान की साधु' (१९३०) या कादंबरीत महात्मा गांधीसंबंधी सरकार, पुढारी जनता यांच्या भिन्न प्रक्रियातून म. गांधी साधु आहेत असा निष्कर्ष काढला आहे. सशस्त्र क्रांतीवर विश्वास ठेवणा—या महाराष्ट्रीय देशभक्ताना सोसाव्या लागलेल्या अपत्तीची जाणीव वा. कृ. भावे 'खरा देशभक्त' (१९३०) या कादंबरीत व्यक्त झाली आहे. दा. ना. शिखरे यांच्या थोरली आई' (१९३४) या कादंबरीत थोरली आई म्हणजे आपली जन्मभूमी तिच्या सेवेकरीता आपल्या ध्येयवादी प्राध्यापकाच्या मार्गदर्शानानुसार कौटुंबिक स्नेहाला व प्रगयी जनांच्या अनुरागाला बाजूला सारून कादंबरी नायक तुरूंगवास पत्करतो हे दाखवले आहे.

गो. नी. ची नौखलीच्या हत्याकांडावर 'तुडवलेले घुसळ' (१९४८), ना. वि. बापटांची १८५७ च्या बंडावर आधारीत 'हंबीरराव व पुतळीबाई', ना. सी. फडके यांची 'निरंजन' (१९३२), 'शाकुंतल' (१९४२), 'गुप्त प्रायश्चित' (१९४१), 'वादळ' (१९४१), कादंबरीतून भारतीय स्वातंत्र्यसंदर्भ कमी अधिक

प्रमाणात दिसतात. १९३० सालातील कायदेभंगाची चळवळ (निरंजन), १९०५ ते १९३० पर्यंतचे कॉंग्रेसचे राजकारण (प्रवासी), समाजवादी विचारसरणीचा उदय (समरभूमी), साम्यवादी विचारसरणी (उन्माद), राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची चळवळ (प्रतिमा) इ. घटना या कादंब—यांतून येत असल्या तरी राजकीय जीवनाचे व घटनांचे चित्रण फार उथळ स्वरूपाचे आहे. श्री. दा. न. शिखरे यांच्या 'माझे रामायण' मधून जालियलवाला बाग हत्याकांडाचे कथानक आले आहे.

'वंदेमातरम' प्रत्येक भारतीयाला वेदमंत्राहूनही अधिक वंदनीय वाटणारा सहा अक्षरी मंत्र, या मंत्राने आपल्या माथ्यावर मिरविला ज्ञात—आज्ञात हुतात्म्यांचा अलौकिक कर्तृत्वाचा रक्ततिलक, सशस्त्र क्रांतीकारकापासून निशस्त्र प्रतिकारापर्यंत असंख्याचा सहभाग लाभलेल्या स्वातंत्र्यसंग्रामाची कहाणी १८५७ मध्ये अंकुरलेली १९४७ पर्यंत आकारत राहिलेली 'सोनेरी पाने' या शब्दाने सार्थ गौरविली जाणरी 'सत्तावन्न ते सत्तेचाळीस' अशा आशयाची वि. स. वाळींबे लिखित १०८० पानांची स्वातंत्र्यलढयाची संस्मरणीय कहाणी नकळत वाचकांच्या मनावर खोलवर रूतून बसते. पूर्वजांच्या पराक्रमाची गाथा होळयासमोर येते व बाहू स्फुरण पावतात.

अशा काही कादंबऱ्यांतून भारतीय स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास आपणास पाहाता येतो.

**एकंदर या शोधनिबंधाच्या शेवटी काही निष्कर्ष हाती येतात.**

१. इंग्रजी शिक्षणातून मिळालेल्या विचारांचा वसा व वारसा पुढीज काळातील पिढीने जपण्याचा प्रयन्न केला
२. कथा कांदबरीचा विचार करता हजारो कथा कादंब—या लिहिल्या गेल्या पण त्या रंजनवादातच मोठया प्रमाणावर गुरफटल्या आहेत. एकंदर कथा व कादंबरी वाड्:मयाचा विचार करता विपुल प्रमाणात निर्मिती असली तरी तत्कालीन स्वातंत्र्यचळवळीचा इतिहास अगदी कमी प्रमाणावर येताना दिसतो.
३. तत्कालीन इंग्रजी दडपशाही वाड्:मयनिर्मितीच्या ऱ्हासास कारणीभूत ठरली.
४. इंग्रजांच्या दडपशाहीचे प्रत्यंतर नाटकामधून मोठया प्रमाणावर दिसते.
५. स्वातंत्र्यचळवळीचा परिपोष करणारी प्रतिकात्मक नाटके मोठया प्रमाणावर लिहिली गेली
६. एकंदर मराठी वाड्:मयाचा विचार करता स्वातंत्र्यचळवळीचे प्रतिबिंब नाटयवाड्:मयातून मोठया प्रमाणावर उमटलेले दिसते.
७. आत्मचरित्रातून स्वातंत्र्योत्तर चळवळी यांचे विवेचन येताना दिसते.
८. स्वातंत्र्यचळवळीचे लेखनचित्रण करणारे बरेचसे साहित्यिक स्वातंत्र्ययोद्धे होते त्यांनी आपआपल्या परिने स्वातंत्र्यलढयात सहभाग नोंदवलेला दिसतो. त्याचे प्रत्यंतर त्यांच्या साहित्यातून येताना दिसते.

९. एकंदर स्वातंत्र्यचळवळीचा विचार करता मराठी साहित्यातून चित्रित झालेली स्वातंत्र्यचळवळ कमी प्रमाणावर असलीतरी जी चित्रित झाली ती राष्ट्रप्रेमाने, निश्चित ध्येयाने व निष्ठेने चित्रित झाली आहे.

१०. काही वाङ्:मयप्रकारातून प्रचारकता दिसत असली तरी तत्कालीन परिस्थितीचा विचार करता तसे होणे व करणे योग्यच होते.

११. साहित्य स्वत्वशोध, आत्मशोध व आनंद यासाठी निर्मिले जात असले तरी ज्या समाजात आपण जगतो वाढतो त्याच्या अंगोपांगावर होणाऱ्या परिणामाचा विचार साहित्याने गरजेचे ठरते तसा विचार तत्कालीन साहित्यातून झाला आहे असे म्हणावे लागते.

- एकंदर स्वातंत्र्यचळवळीचे चित्रण करणारे साहित्य यावर मराठीत एकही ग्रंथ उपल्बध नाही यादृष्टीने असा एकत्रित ग्रंथ मराठी वाचकांसाठी उपलब्ध व्हावा असे वाटते.

प्रा. डॉ. भरत भिमराव जाधव
कला व वाणिज्य महाविद्यालय,
सातारा.

## संदर्भग्रंथ

१.प्रदक्षिणा – खंड –१ जोग रा. श्री., बनहटटी श्री. ना पाचवी आवृत्ती १९७२ कॉप्टीनेन्टल प्रकाशन विजयानगर पुणे ३०
२.प्रदक्षिणा खंड – २
कॉप्टीनेन्टल प्रकाशन विजयानगर पुणे ३०
३.साहित्य ! ग्रामीण आणि दलित – २००२ संपा. ईश्वर नंदपुरे – विजय प्रकाशन – नागपूर
४.आधुनिक भाषा विज्ञान – कल्याण काळे, अंजली सोमण प्रतिमा प्रकाशन पुणे १९९९
५.साहित्य समीक्षा आणि संवाद – डॉ. रवींद्र ठाकूर दिलीपराज प्रकाशन पुणे
६.मराठी आणि दारखिनी हिंदी – चौधन देबीसिंह महाराष्ट्र राष्ट्रसभा पुणे (१९७१)
७.मराठी भाषा उद्‌गम व विकास – कृ. पा. कुलकर्णी ४थी आवृत्ती मॉर्डन बुकडेपो १९६३
८.'बोली भाषाचा अभ्यास'' भाषा व साहित्य संशोधन सु.बा. कुलकर्णी – मराठी साहित्य परिषद पुणे १९८१ – पान ६९ ते १२३
९.भाषा व संस्कृती – ना. गो. कालेलकर मौज प्रकाशन – मुंबई १९६२
१०.आधुनिक भाषा विज्ञान – मिलिंद मालशे १९९५ सिदधांत व उपयोजन लोकवाङ्:मय गृह मुंबई १९९५
११.ग्रामीण सहित्य स्वरूप आणि शोध डॉ. कोत्तापल्ले पाब्लि. पुणे १९९३
१२.मराठी साहित्य स्वरूप आणि समस्या डॉ. आनंद यादव मेहता पाब्लि. पुणे १९९३
१३.मराठी ग्रामीण कांदबरी. डॉ. रवींद्र ठाकूर स्नेहवर्धन प्रकाशन – पुणे
१४.तौलनिक साहित्य आणि मध्ययुगीन मराठी वाङ्:मय डॉ. र.बा. मंचरकर
१५.ब्रिटीश बॉम्बे आणि पोर्तुगिज गोव्यातील वाङ्:मय – डॉ. आनंद पाटील. ग्रंधाली प्रकाशन मुंबई १९९९